साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. १४ एप्रिल २०२५ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.



माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देणाऱ्या
**महामानव भारतरत्न**
**डॉ.भीमराव रामजी आंबेडकर**
यांना जयंतीनिमित्त
***त्रिवार अभिवादन !***
**- संपादक**

## राज्यातील १३२ रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास करण्याची योजना; पायाभूत सुविधांसाठी १.७३ कोटी रुपयांची गुंतवणूक - रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव




मुंबई, (बातमीदार):- विदर्भातील गोंदिया ते बल्हारशाह या रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणासाठी ४,८१९ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. सोबतच बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथील रेल्वे स्थानकासह राज्यातील एकूण १३२ रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास करण्यात येणार आहे.

विश्व वारसा स्थळ म्हणून घोषित असलेल्या मुंबईमधील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसचा देखील यात समावेश आहे. पुनर्गस होणाऱ्या रेल्वेस्थानकांमध्ये छत्रपती संभाजी नगर रेल्वे स्थानक तसेच जालना, परभणी, परतुर, सेलू, गंगाखेड आदि रेल्वेस्थानकांचाही समावेश आहे.

यावेळी अन्य घोषणा करताना विदर्भातील गोंदिया ते बल्लारशाह रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणासाठी ४८१९ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याची घोषणा देखील रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली.

या प्रकल्पामुळे विदर्भातील रेल्वे जाळे अधिक मजबूत होणार असून मध्य प्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा व आंध्र प्रदेशाशी व्यापार-व्यवसाय वाढण्यास मदत होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानले आहे.

जिओ कन्व्हेशन सेंटर, बीकेसी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची संयुक्त पत्रकार परिषद झाली. महाराष्ट्रात रेल्वे विकासासाठी विक्रमी निधी देण्यात आला असून याद्वारे १३२ रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास करण्यात येणार आहे. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसचाही समावेश आहे. रेल्वेच्या पायाभूत विकासासाठी एकूण १.७३ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक केंद्र शासनाकडून करण्यात येत आहे. यावर्षी रेल्वे बजेटमधून महाराष्ट्राला २३,७०० कोटी रुपये प्राप्त झाले असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले. रेल्वे मंत्रालयाच्या माध्यमातून लवकरच छत्रपती शिवाजी महाराज सर्किट सुरू होणार आहे. यामध्ये महाराजांच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाचे किल्ले, सांस्कृतिक स्थळे यांचा समावेश असलेला १० दिवसांचा टूर आयोजित केला जाणार आहे. या उपक्रमामुळे महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचवण्यास मदत होणार आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. ****

### परळी रेल्वे स्थानकासाठी २५.७ कोटी रुपये निधी मंजूर

बारा ज्योतिर्लिंगांपैकी पंचम ज्योतिर्लिंग स्थान असलेल्या परळी वैजनाथ येथील रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकासासाठी २५.७ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आले आहेत. प्रभू वैद्यनाथ ज्योतिर्लिंग देवस्थानाच्या दर्शनास येणाऱ्या भाविकांच्या सोयी-सुविधा सह या भागातील दळणवळण सोयीस्कर व गतिमान होण्यास याचा मोठ्या प्रमाणात लाभ होणार आहे. राज्यातील एकूण १३२ रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकास कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे.त्याअंतर्गत परळी वैद्यनाथ रेल्वे स्थानकाचाही समावेश करण्यात आलेला आहे. रेल्वे स्थानक पुनर्विकास कामासाठी २५.७ कोटी रुपये निधी आता मंजूर करण्यात आलेला आहे.रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकास कामासाठी भरीव निधी मंजूर केल्याबद्दल केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आ.धनंजय मुंडे यांनी आभार व्यक्त केले आहेत. प्रभू वैद्यनाथ ज्योतिर्लिंग देवस्थानाच्या दर्शनास येणाऱ्या भाविकांच्या सोयी-सुविधा सह या भागातील दळणवळण सोयीस्कर व गतिमान होण्यास याचा मोठ्या प्रमाणात लाभ होणार आहे.

## अंबाजोगाई येथे शेतकरी भवन उभारणीस १.५२ कोटी रुपये निधी मंजूर

अंबाजोगाई (बातमीदार):- माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या मागणीनुसार कृषी उत्पन्न बाजार समिती अंबाजोगाई येथे नवीन शेतकरी भवन उभारण्याच्या १ कोटी ५२ लाख ६८ हजार रुपयांच्या अंदाजपत्रकास सहकार विभागाने आज प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

अंबाजोगाई कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये सुसज्ज असे शेतकरी भवन उभारण्यात यावे, यासाठी सभापती तथा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड राजेश्वर आबा चव्हाण यांच्या सह सर्व संचालक मंडळाच्या वतीने धनंजय मुंडे यांना विनंती करण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी ही मागणी राज्य शासनाकडे करून पाठपुरावा करून सदर प्रशासकीय मान्यता प्राप्त करून दिली असून, याबद्दल अंबाजोगाई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड राजेश्वर आबा चव्हाण, उपसभापती श्री करनर यांच्या सह सर्व संचालक मंडळाच्या वतीने राज्य शासनाचे व आ. धनंजय मुंडे यांचे आभार मानले आहेत. ***

## जनहितचा महिला उद्योजक व ग्राहक मेळावा संपन्न





परळी वैजनाथ, (बातमीदार):- जनहित पतसंस्था मर्यादित परळी वैजनाथ यांच्या वतीने सिरसाळा ता. परळी वै. जि. बीड येथे मेळाव्याआयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे मुख्य उद्दिष्ट, महिला उद्योजकांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, जिथे त्या आपल्या उत्पादनांची आणि सेवांची जाहिरात करू शकतील.

ग्राहकांना विविध प्रकारची उत्पादने आणि सेवा निवडण्याची संधी मिळेल, ज्यामुळे त्यांना चांगल्या प्रतीची उत्पादने खरेदी करता येतील. महिला उद्योजकांना नवीन संधी मिळतील आणि ग्राहकांनाही चांगल्या प्रतीची उत्पादने मिळतील, हा विश्वास घेऊन मेळावा आयोजित करण्यात आला होता.

उत्पादनाची गुणवत्ता टिकून ठेवून,कामातील सातत्य आणि चिकाटीच्या जोरावर उद्योग क्षेत्रात उभ राहता येत. महिला उद्योग प्रदर्शनी आणि विक्री मेळाव्यात सहभाग घेऊन, तंत्रज्ञानाचा उपयोग करून आपल्या उत्पादनाची जाहिरात करावी व बाजारात आपले स्थान निर्माण करावे. ग्राहकांच्या पसंतीला उतरून मागणीनुसार पुरवठा केल्यास, उद्योग क्षेत्रात यश मिळायला वेळ लागत नाही. असा विश्वास कार्यक्रमाच्या उद्घाटक ॲड. छाया धुमाळ पाटील यांनी व्यक्त केला. जिल्हा उद्योग केंद्र बीडच्या समन्वयक शहिदा बेगम यांनी येत्या काळात सिरसाळ्यात महिलांसाठी विविध कार्यशाळाचे आयोजन करू, महिला सक्षमीकरण साठी आम्ही कटिबद्ध आहोत. महिलांनी गृहउद्योगात आपलं स्थान निर्माण करण्यासाठी प्रयत्नरत राहावं.महिला सक्षमीकरणासाठी जनहित पतसंस्था सदैव पाठीशी राहील.असा विश्वास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष उत्तम यशवंतराव माने यांनी दिला. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष अनिल माने, उपाध्यक्ष सुभाषराव पौळ, सरपंच अन्वर पट्टेदार, सौ.सविता देशमुख, डॉ.राहुल शिंदे, डॉ.पंढरीनाथ पवार, बाबासाहेब काळे, आयासोद्दीन इनामदार,रमेश पौळ, प्रमोद किरवले, पत्रकार मिलिंद चोपडे, अशोक गलांडे बाळासाहेब गरड, दिगांबर देशमुख, कुंडलिक लहाने संस्थेचे संचालक मंडळ कर्मचारी उद्योजक भगिनी ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थिती होते. या कार्यक्रमात ३४ उद्योजकांनी स्टॉल लावले होते. या कार्यक्रमाचा लाभ अडीचशे ते तिनशे ग्राहकांनी घेतला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा डॉ. उषा यशवंतराव माने यांनी केले, आभार तुकाराम माने यांनी मानले. ***

## हवालदार हनुमंत दहिफळे यांनी भारतीय सैन्य दलातील केलेल्या देशसेवेचा सार्थ अभिमान - डॉ.संतोष मुंडे

परळी वैजनाथ (बातमीदार):- भारतीय सैन्य दलात विविध संकटांना सामोरे जात आपल्या प्राणाची बाजी लावून देशाचे रक्षण करणारे जवान भारतमातेचे भूषण असतात. परळी वैजनाथ तालुक्यातील खोडवा सावरगावचे भूमिपुत्र हनुमंत दहिफळे हे नुकतेच भारतीय सैन्य दलातून सेवानिवृत्त झाले आहेत. सेवानिवृत्तीनंतर त्यांचा सत्कार करताना दिव्यांग मंत्रालय महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान झाला. दरम्यान हनुमंत दहिफळे यांनी भारतीय सैन्य दलात जी देश सेवा केली. त्या सेवेचा आम्हाला



सार्थ अभिमान आहे. त्यांच्या कार्याचा तरुणांनी आदर्श घ्यावा असेही आवाहन केले. खोडवा सावरगाव येथील राहिवाशी हवालदार हनुमंत दहिफळे हे २००८ मध्ये सैन्य दलात दाखल झाले होते. भारतीय सैन्यात दाखल होताच सुरुवातीच्या काळामध्ये पुणे सेंटर मध्ये तसेच पुणे (महाराष्ट्र)., बिकानेर (राजस्थान)., कालिमपाँग (वेस्ट बंगाल). कळूचाक (जम्मूकाश्मीर). पंचांगम (श्रीनगर). पुणे (महाराष्ट्र) आशा ठिकाणी त्यांनी काम केले. हनुमंत अंगद दहिफळे यांचे प्राथमिक शिक्षण खोडवा सावरगाव या गावी झाले. त्यानंतर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण खोडवा सावरगाव तर इयत्ता अकरावी, बारावी धर्मापुरी महाविद्यालयात केल्यानंतर पुढील बीएपर्यंत शिक्षण जवाहर महाविद्यालयात

(उर्वरित पान ४ वर)

# रस्त्यात अपघाताचा बनाव केला; सुमारे २० टन सोयाबीन तेलाचा केला अपहार

परळी वैजनाथ, (बातमीदार):- लातूरहून ३२ लाख ५१ हजार रु.किंमतीचे तेल भरलेले टँकर घेऊन निघाला. परळीजवळील धर्मापुरी ते गुट्टेवाडी रस्त्यात आपघात झाल्याचे सांगितले. मात्र तसे काहीच घडले नाही तर सोयाबीन रिफाईन्ड तेलाची ने-आण करणाऱ्या एका टँकरचा आपघात झाला व तेल रस्त्यावर सांडून गेले असा बनाव या टँकरच्या चालकाने केला व स्वतःच्या अर्थिक फायद्यासाठी २४.९३० टन सोयाबीन रिफाईन्ड तेलापैकी तब्बल २०.४१० टन तेल विक्री करत आपहार केल्याप्रकरणी परळी ग्रामीण पोलीसात संबंधित चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार, संजय ज्ञानोबाराव फुके वय-५२ वर्षे व्यवसाय-व्यापार रा घर नं ७९ गजानन कृपा निवास पंचमुखी हनुमान मंदिराच्या पुढे, गणेश नगर नांदेड जि नांदेड या व्यापाऱ्याकडील तेलाची ने-आण करणाऱ्या टँकरवर राजेंद्र शिवाजी मुंडे रा. सेलमोहा ता- गंगाखेड जि परभणी हा चालक काम करत होता. जितुंर येथीलमयुर प्रदिप कोकडवार यांच्या मयुर एजन्सीनेमास फुड प्रोडक्ट यांचेकडून तेलाची खरेदी ऑर्डर केली.हे तेल ए डी एम अॅग्रो इंडस्ट्रीज लातुर यांच्याकडून टँकरमध्ये भरणा करण्यात आले.हे टँकर घेऊन यातील आरोपी चालक लातूरहून जिंतूरकडे जात असतांना परळीजवळील धर्मापुरी ते गुट्टेवाडी या रस्त्यावर या टँकरचा आपघात झाला आहे असा त्याने बनाव केला.टँकरमधून भरणा केलेले २४.९३० टन सोयाबीन रिफाईन्ड तेल किंमत रुपये ३२,५१,९२१/- यापैकी २०.४१० टन सोयाबीन रिफाईन्ड तेल रस्त्यावर सांडून गेल्याचाही बनाव केला.अपघाताच्या बनावामध्ये काही तेल जमिनीवर पसरुन नुकसानही केले.तब्बल २०.४१० टन सोयाबीन रिफाईन्ड तेल स्वतःच्या अर्थिक फायद्यासाठी विकून टाकले व आपहार केला.अशा आशयाच्या फिर्यादीवरुन परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात या चालकाविरुद्ध गुरनं१५२/२०२५ कलम ३१८(४), ३१६(२), ३२४(४), बीएनएस प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास सपोनि केदार हे करीत आहेत.

# धर्मापुरी येथे श्री रोकडेश्वर मंदिराचा जीर्णोद्धाराचा कार्यक्रम उत्साहात साजरा

परळी वैजनाथ, (बातमीदार):- शिल्पमंदिरांची ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेल्या धर्मापुरी (ता. परळी) येथे युवक व ग्रामस्थांनी लोकसहभागातून उभारलेल्या श्री रोकडेश्वर जागृत देवस्थानच्या सुंदर अशा मंदिराची भर पडली आहे. श्री रोकडेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा श्रीराम नवमी ते हनुमान जयंती या कालावधीत आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व हनुमान-शिव महापुराण कथा आणि प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण कार्यक्रमाने पार पडला. या सोहळ्याची सांगता शनिवारी (दि. १२) सकाळी हनुमान जन्मोत्सवाने झाली.

निसर्गरम्य परिसरात १००० वर्षांपूर्वी चालुक्य नरेश सहाव्या विक्रमादित्याच्या राजवटीत वसविण्यात आलेल्या धर्मापुरी नगरीत आजही अस्तित्वात असलेले श्री केदारेश्वर मंदिर, श्री मल्लिकार्जुन मंदिर, आई तुकाई देवीचे मंदिर, चालुक्यकालीन राजवाडा



(किल्ला) या वास्तू ऐतिहासिक शिल्पांचा वारसा साक्ष देत उभ्या आहेत. या नगरीत अंबाजोगाई-अहमदपूर राज्य मार्गालगत श्री रोकडेश्वर जागरण देवस्थान आहे. येथे रोकडेश्वराचा पार आहे. गावातील नवयुवकांच्या संकल्पनेतून या पाराचे रूपांतर मंदिरात करण्याचे ठरले आणि समस्त ग्रामस्थांनी या मंदिराचा जिर्णोद्धार करण्यासाठी सढळ हाताने मदत केली. श्री रोकडेश्वर मंदिराची उभारणी झाली आणि श्रीराम नवमीपासून ते आज हनुमान जयंती दिनापर्यंत अखंड हरिनाम सप्ताह, हनुमान-महा शिव पुराण कथा व कलशारोहण सोहळा घेण्यात आला. या सप्ताहात दैनंदिन धार्मिक कार्यक्रमांमध्ये हभप आशिष महाराज बडे शास्त्री, किशन महाराज परचंडेकर, संजय महाराज तांबडे, व्यंकटी महाराज फावडेवाडीकर, केशव महाराज बडे, मुंजाजी महाराज चाटे, मनोहर महाराज आळंदीकर, हरिहर महाराज घुले यांचे प्रवचन झाले. तर हनुमान जयंतीला पहाटे ५ ते ७ या वेळेत भागवताचार्य प्रभाकर महाराज सोलकर यांचे काल्याचे तथा हनुमान जन्मोत्सवाचे कीर्तन झाले. सूर्योदय होताच हनुमान जन्मोत्सव गुलालाची उधळण करून थाटात साजरा करण्यात आला. त्यानंतर महाप्रसादाने सोहळ्याची सांगता झाली.

या सोहळ्यासाठी समस्त ग्रामस्थांनी सहकार्य केले. ***

# लोकमान्य नागरी (मल्टीस्टेट) व महात्मा जोतिबा फुले शिक्षक पतसंस्थेत महात्मा जोतिबा फुले यांची जंयती साजरी



परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथील लोकमान्य नागरी (मल्टीस्टेट) सहकारी पतसंस्था व महात्मा जोतिबा फुले शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतसंस्थेत समाजातील शोषित व वंचितासाठी समाजवादाची पताका हाती घेऊन सत्यशोधक समाज निर्माण करणारे स्त्री शिक्षणाचे जनक क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले यांची जंयती संयुक्तपणे साजरी केली.

संस्थेच्या कार्यालयात दुपारी ठीक १ वाजता लोकमान्य नागरी (मल्टीस्टेट) पतसंस्थेचे अध्यक्ष तथा शिक्षक नेते मा.श्री. पी.एस.घाडगे सर व महात्मा जोतिबा फुले शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष बंडू अघाव यांच्या शुभहस्ते महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी दोन्ही पतसंस्थाचे संचालक, व्यवस्थापक व कर्मचारी उपस्थित होते.

****

# वयोवृद्ध जोडप्याचे सुमारे नऊ लाखांचे सोन्याचे दागिने पळवले

परळी वैजनाथ, (बातमीदार):- बीडहून परळी आणि परळीहून सोनपेठ येथे एसटीने प्रवास करणाऱ्या सोनपेठ येथील रहिवासी वयोवृद्ध जोडप्याला मोठ्या बिकट प्रसंगाला सामोरे जावे लागले असुन आयुष्यभर पै पै जमा करून कमविलेले सोन्याचे तब्बल ९लाखाचे दागिने चोरीला गेल्याची घटना दि.१० रोजी घडली आहे.याप्रकरणी आता परळीच्या संभाजीनगर पोलीस ठाण्यात अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार, फिर्यादी महिला माधुरी सुर्यकांत परळकर वय ६० वर्षे रा.महाजनगल्ली सोनपेठ यांनी संपूर्ण हकिकत नोंदवली आहे.त्यानुसार फिर्यादी महिला व त्यांचे पती हे छ. संभाजीनगर येथे आपल्या मुलीकडे गेले होते. दि. १०/४/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. संभाजीनगर येथून एस.टी. बसने बीडला आले. बीड येथून सोनपेठला जाण्यासाठी बीड- परळी बसने दुपारी १२.००० वा. बीड येथून निघून परळीला दुपारी सव्वा दोन ते आडीच वा. सुमारास बस स्थानकात आले. सोनपेठची बस गेली होती. म्हणुन त्यांनी परळी बस स्थानकावर उसाचा रस घेतला व दुपारी तीन वाजताच्या सुमारास परळी- सोनपेठ बसने सोनपेठला गेले. घरी गेल्यावर बॅग तपासली असता बॅग मधील लाल पर्समध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने दिसले नाहीत. या पर्समध्ये १) कि. अंदाजे ३,००,०००-(रु) एक खर्बुज्या मन्याची तिन पदरी मोहन माळ सोन्याची राहा तोळे वजनाची जुनी वापरती २)किं. अंदाजे ३,००,०००-(रु) एक सोन्याची पट्टी गंटन राहा तोळे वजनाचे जुने वापरते. ३ किं. अंदाजे २,००,००० रु.- एक नेकलेस साखळी पॅडॉलचे सोन्याचे पॅडॉलमध्ये लाल खडा असल्याले चार तोळे वजनाचे जुने वापरते ४ किं. अंदाजे १,००,००० रु. एक सोन्याची बोरमाळ त्यात डिसको मनी असल्याले दोन तोळे वजनाची जुनी वापरती असे एकुण ९,००,०००-०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरीस गेल्याचे लक्षात आले. याप्रकरणी परळीच्या संभाजीनगर पोलीस ठाण्यात अज्ञाताविरुद्ध चोरीच्या गुन्ह्याची नोंद करण्यात आली असुन पुढील तपास संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे व सहकारी करीत आहेत. ***

# परळी नगरपालिकेने शहरात विविध मार्ग व चौक मार्गदर्शक फलक लावावेत- स्वातीताई ताटे

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी नगर परीषदेने परळी शहरात विविध मार्ग व चौक मार्गदर्शक फलक लावावेत अशी मागणी जिव्हेश्वर महीला विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा तथा सामाजीक कार्यकर्त्या सौ.स्वातीताई ताटे यांनी केली आहे.

नामांकीत शहरामध्ये वेगवेगळ्या मार्गाचे व चौक मार्गदर्शनाचे फलक लावलेले आहेत बीड जिल्ह्यातील परळी हे शहर बारा ज्योतीर्लींगापैकी एक ,रेल्वे ,औष्णीक विद्युत केंद्र यामुळे देशाच्या नकाशा शिवाय जागतीक किर्तीचे शहर आहे. परंतु शहरामध्ये विविध मार्ग व चौकाचे नावाचे फलक न लावल्यामुळे सुशिक्षीत नागरीकांना ही विविध मार्ग व चौकाविषयी माहीती विचारावी लागते.त्यामुळे सुशिक्षीत आसुन ही त्या व्यक्तीस अशिक्षीत बनावे लागते.

अनेक नागरीक किंवा संघटना विविध भागास कोणाचीही परवानगी न घेता त्या भागाचे नामकरण करतात.अशा भागास नगर परीषद मान्यता देते. तेंव्हा नगर परीषदेने राहीलेल्या चौकास व मार्गास नाव देवुन मार्गदर्शक फलक लावावेत जेने करुन परळी शहराच्या वैभवात भर पडेल.याची दखल नगर परीषदेने त्वरीत घ्यावी अशी मागणी सौ.स्वातीताई ताटे यांच्या सह सौ.वैजयंती इंगळे, सौ.अनुराधा कौसाल्ये, सौ.मिरा घट्टे,सौ.सुनंदा मानकर, सौ.कल्पना ठोंबरे, सौ.मंजुषा आरबुने, सौ.रंजना जंत्रे, सौ.मंजुषा पोरे, सौ.अलका आरबुने, सौ.सुरेखा आरबुने, सौ.पदमा लटंगे, सौ.माया बडकस, सौ.सारिका आरबुने, सौ.राणी लटंगे, सौ.अंजली पोरे, सौ.अरूणा भंडारे, सौ.अर्चना भंडारे, सौ.जान्हवी भंडारे, सौ.मयुरी डांगरे, सौ.छाया लिमकर, सौ. किरण गालम, सौ.सविता मांगलकर, सौ.अलका पोरे, सौ.साधना वीर, सौ.प्रिया लिखे, सौ.शोभा कांबळे, सौ.सुलोचना नाजरे आदींनी केले आहे. ***

(पान १ वरुन)...... **डॉ.संतोष मुंडे**

पूर्ण केले. यादरम्यान भारतीय सैन्यामध्ये भरती निघाली असता त्यांनी देश सेवा करण्याचे पसंत केले आणि सैन्य दलात भरती झाले. त्यांनी १७ वर्षापेक्षा जास्त सेवा केली. प्रत्येक घरातील एक तरी सदस्य देश सेवा करण्यासाठी सैन्यात जायलाच पाहिजे अशीही भावना हनुमंत दहिफळे यांनी व्यक्त केली. डॉ. संतोष मुंडे म्हणाले की, आपल्या देशाच्या सिमांचे रक्षण करणाऱ्या बहाद्दर सैनिकांचा आपुलकीने सन्मान करणे हे आपले कर्तव्य आहे, या सैनिकांचा आम्हाला गर्व नक्कीच आहे. भारतीय सैन्यात चांगली सेवा देवून नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यांचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. युवकांनी हा आदर्श समोर ठेवून देश रक्षणासाठी भारतीय सैन्य दलात भरती व्हावे.असे आवाहन केले. खोडवा सावरगाव येथील राहिवाशी हवालदार हनुमंत दहिफळे हे नुकतेच ३१ मार्च २०२५ रोजी भारतीय सैन्य दलातून निवृत्त झाले. यानंतर त्यांचा डॉ. संतोष मुंडे यांनी श्रीनाथ हॉस्पिटलमध्ये सत्कार केला.***

संपादकीय...

# दिव्या खाली अंधार...!

※ सुविचार ※

उगवत्या सूर्याला नमस्कार करताना मावळत्या चंद्राला विसरू नका..! - डॉ बाबासाहेब आंबेडकर

गेल्या ५०-५५ वर्षापासून सबंध महाराष्ट्राला विद्युत पुरवठा करून प्रकाशमय करणारे परळी हे गाव. येथील औष्णिक वीज निर्मिती केंद्रातून तयार होणारी वीज सबंध राज्यात वितरीत होते. वीज निर्मिती केंद्रामुळे राख, राखेचे प्रदूषण व इतर अनेक समस्यांचा सामना परळीकरांना करावा लागतो. वाढत्या विजेच्या मागणीमुळे मधल्या काळात राज्यात विजेचे भारनियमन सुरू झाले होते. तेंव्हा जिथे वीज निर्मिती केंद्र आहे. ती गावे भारनियमन मुक्त करण्याची मागणी नागरिकांनी पुढे केली. याची दखलही राज्य सरकारने घेतली आणि वीज निर्मिती केंद्र असणाऱ्या गावांना विजेच्या भारनियमनातून मुक्तता दिली.

वीज केंद्र असलेल्या परळीकरांची भारनियमनातून मुक्तता झाली असली तरी परळीत वीज पुरवठ्याची समस्या मात्र अनेक वर्षापासून कायम आहे. उन्हाळा, पावसाळ्यात दिवसभरातून अनेक वेळा व अनेक तास वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रकार येथे सतत घडतात. यामुळे सर्वसामान्यांची मोठी गैरसोय तर होतेच शिवाय त्याचा इथल्या व्यापार, उद्योगाला मोठा फटका बसतो. परळी शहर व परिसरात सुमारे तीस हजार वीज ग्राहक आहेत. त्यात व्यापार, उद्योग व घरगुती वीज वापरणारे ग्राहक यांचा समावेश आहे. वीज बिलाची वसुलीही येथे चांगली आहे. ऐंशी टक्क्यावर वीज ग्राहक नियमित वीज बील भरतात. नगर पालिका व इतर काही शासकीय, निमशासकीय कार्यालये तसेच काही सर्वसामान्य ग्राहकांकडील वीज बील वेळेवर भरले जात नाही असे असले तरी नियमित वीज भरणाऱ्या ऐंशी टक्के परळीतील सर्वसामान्य वीज ग्राहकांना अखंड वीज पुरवठा का केला जात नाही असा सवाल सर्वसामान्य वीज ग्राहक येथे उपस्थित करत असतात. दिवसभरातून अनेक वेळा वीज गुल होते. काही वेळा तर लाईट बंद झाल्यावर तासन्तास येत नाही. यामुळे सर्वसामान्य नागरिकांची मोठी गैरसोय होते. परळीत सतत वीज पुरवठा खंडित कशामुळे होतो हा प्रश्न इथल्या वीज ग्राहकांना सतत पडलेला असतो. एखाद्या भागात अनेक तास वीज पुरवठा काही कामासाठी बंद केला जाणार असल्यास त्याची माहिती ग्राहकांना दिली जात नाही. मधल्या काळात एखाद्या भागात वीज पुरवठा खंडित होणार असल्यास त्याची माहिती वीज ग्राहकांना मोबाईलवर 'एसएमएस' द्वारे मिळत असायची. परंतु आता वीज पुरवठा खंडित होणार असल्याचे एसएमएस येत नाहीत की सर्वसामान्य ग्राहकांना माहिती दिली जात नाही. यामुळे ग्राहकांना त्रास सहन करावा लागतो.

परळीत आठ-आठ दिवस नळाला पाणी येत नाही. ज्या दिवशी नळाला पाणी येते तेंव्हा विजेची मोटार नळाला लावल्याशिवाय पाणी भरता येत नाही. नळाला पाणी येते तेव्हा वीज पुरवठा बंद असल्यास अनेक परळीकरांना पाणी मिळत नाही. वीजपुरवठा व्यवस्थीत नसल्यामुळे परळीतील छोटे-छोटे उद्योजक, व्यापारी यांचे मोठे नुकसान होते. एकूणच परळीतील वीज वितरण कंपनीच्या गलथान कारभाराला इथला सर्वसामान्य ग्राहक वैतागलेला आहे. परळीत नियमित व अखंडित वीज पुरवठा करण्याची त्यांची मागणी असते. स्थानिक नेते, कार्यकर्तेही अखंड वीज पुरवठ्याबाबत सतत आग्रही असतात. बऱ्याचवेळा यासाठी आंदोलनेही होतात, परंतु वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना घाम फुटत नाही. परळीत वीज ग्राहकांना अखंड वीज पुरवठा करण्यासाठी ते फारसे प्रयत्न करताना दिसत नाहीत.

पूर्वी शहरात वीज पुरवठा बंद झाल्यानंतर वीज वितरण कंपनीच्या स्थानिक कार्यालयात ग्राहक दूरध्वनी करत असत आता हा दूरध्वनी बंद केला गेला आहे. आपल्या भागातील संबंधीत लाईनमनला मोबाईल द्वारे फोन करण्याचे सांगितले जाते, परंतु संबंधितांचे मोबाईल बऱ्याच वेळा लागत नाही. अशी तक्रार ग्राहकांची असते.

परळीत वीज बील भरणा केंद्र ठिकठिकाणी होते. त्यातील अनेक केंद्र आता बंद पडली आहेत. शहरात वीज चोरीचे प्रमाणही वाढले आहे. याकडे वीज वितरण कंपनीच्या वरिष्ठांनी लक्ष घालायला हवे. एकूणच परळीत सर्वसामान्य ग्राहकांना अखंड वीज पुरवठा व्हावा, त्यांना चांगली सेवा मिळावी अशी अपेक्षा इथल्या वीज ग्राहकांची आहे. ***

# राजधानी दिल्लीशी डॉ.बाबासाहेबांचे जिव्हाळ्याचे नातं.!

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आयुष्यातील बराच काळ दिल्लीत गेला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दिल्लीचे एक वेगळे नातेही निर्माण झाले. ब्रिटिश सरकारच्या म्हणजे प्रांतीय मंत्रिमंडळात ते कामगार मंत्री होते त्यामुळे दिल्लीत त्यांचे वास्तव्य असायचे. या काळात ते देशभर फिरत होते. जनतेच्या समस्या जाणून घेत होते आणि मंत्री म्हणून त्यावर निर्णय घेत होते.

दिल्लीत असताना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाच्या उभारणीत मोठे योगदान दिले. याच काळात, म्हणजे दिल्लीत असताना त्यांनी देशावर दीर्घकालीन परिणाम करणारे निर्णय घेतले. मग ते कामगार कायदे असोत की महिलांच्या अधिकाराचे निर्णय असोत. याच काळात बाबासाहेब आंबेडकर यांनी अहोरात्र मेहनत करून राज्यघटनेचा मसुदा तयार केला तसेच त्यानंतर हिंदू कोड बिल तयार केले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा दिल्लीत आलेत तेव्हा ते एकटे राहत असत. माता रमाईचे निधन झाल्यानंतर तसे बाबासाहेब खूप दुखावले होते. पण आपल्या प्रकृतीच्या तपासणीसाठी त्यांचे मुंबईला नियमितपणे वैद्यकीय डॉक्टरांचा सल्ला घेण्यासाठी जावे लागत असे. तिथेच डॉक्टर मालवणकर यांच्याकडे डॉ सविता कबीर यांची डॉ बाबासाहेब



आंबेडकर यांच्याशी भेट झाली आणि त्यांचे कोर्ट मॅरेज झाले. याच काळात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या अनेक ग्रंथाचे लिखाण केले. देशाच्या फाळणीवरील त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ त्यांनी दिल्लीतच पूर्ण केला. त्यानंतर त्यांच्या आयुष्यातील शेवटचा जगप्रसिद्ध असलेला ग्रंथ "बुद्ध आणि त्यांचा धम्म " दिल्लीतच लिहीला. या काळात दिल्लीतील लोकांशी त्यांचे संबंध आले. हे नाते दृढ होत गेले.

उत्तर भारतीयांचा गोतावळा त्यांच्या भोवती असायचा. त्यांना बघायला, ऐकायला, भेटायला लोक सतत येत असत. सुरूवातीला बाबासाहेब यांचे निवास १ हार्डिंग एवेन्यु (गुबंद कोठी) येथे होते. सध्या याला टिळक मार्ग म्हणतात. त्यांचे शेवटचे दिवस सीव्हील लाईन्स येथील २६ अलीपुर रोड येथील कोठीत गेले. भारत सरकारने बाबासाहेब यांच्या स्मरणार्थ या ठीकाणी मोठे स्मारक बांधले आहे.

दिल्लीत असताना बरेच लोकांचा त्यांच्या परीचय झाला. हा ऋणाणुबंध वाढला. बाबासाहेबांना बरेच लोक आपले सुख दुःख सांगत असत. बाबासाहेब यांच्या आऊट कार्टरमध्ये त्यांचे निकटवर्ती सोहनलाल शास्त्री, जे विधी विभागात अधिकारी होते, ते राहत असत. त्यांचा बाबासाहेबांशी जवळीकतेचा स्नेह होता. त्यांच्या जवळचे असलेले चौधरी देवीदास जी यांचे ही बाबासाहेब यांच्या दिल्लीतील घरी येणे जाणे होत असे. चौधरी देवीदास यांचा मुलगा लाला हरीचंद आणि सुन भुरिया देवी यांना २ ऑक्टोबर १९४९ रोजी पुत्र रत्न झाले आणि या बालकाचे नाव गुलाब सिंग असे ठेवण्यात आले. ही आनंदाची बातमी बाबासाहेबांना दयायची होती. त्या दिवशी बाबासाहेब दिल्लीत नव्हते. ते दोन दिवसांसाठी काश्मीर दौऱ्यावर होते. बाबासाहेब काश्मीरहून परत आल्यावर कळाल्यावर चौधरी देवीदास यांनी लाडुचा डबा घेऊन बाबासाहेबांचे घर गाठले. तेव्हा बाबासाहेब त्यांच्या मित्र आणि आप्तांसोबत चर्चेत दंग होते. बाबासाहेबांनी चौधरी देवीदास यांना गेटमधून येताना बघून देवीदास यांचे अभिवादन स्वीकारले. देवीदास हे अंत्यत हर्षामध्ये बाबासाहेबांना सांगू लागले की त्यांना नातु झालेला आहे. मिठाई त्याच्या आनंदात आणली आहे. बाबासाहेबांना मधुमेह असल्यामुळे त्यांनी ती खाल्ली नाही मात्र, सोबत असणाऱ्यांमध्ये वाटून दिली. नातवाचे नाव गुलाब सिंग ठेवण्यात आले असल्याचे चौधरी नी बाबासाहेबांना सांगितले. त्यावर बाबासाहेब यांनी शुभेच्छा देत विचारले, आई आणि बाळ दोघेही बरे आहेत ना. यावर चौधरी यांनी होकारार्थी उत्तर दिले.

बाबासाहेब म्हणाले, गुलाब सिंग हे नाव काही बरे वाटत नाही. त्यांनी बाजुला ठेवलेले वर्तमान पत्र उचलले, त्यात शांतीस्वरूप हे नाव वाचले आणि चौधरी यांना सांगितले की आता तुझ्या नातवाचे नाव गुलाब सिंग हे न ठेवता तु शांतीस्वरूप असे ठेव. त्याप्रमाणे चौधरी देवीदास यांनी कागदोपत्री नाव बदलून शांतीस्वरूप हे नाव ठेवले.

पुढे शांतीस्वरूप यांनी भारत सरकारच्या गृह खात्यात नोकरी केली. निवृत्त झाल्यानंतर त्यांनी 'सम्यक' या नावाने प्रकाशन संस्था सुरू केली. उत्तर भारतातील नवोदित लेखकांना त्यांनी संधी दिली. वर्ष २०२० मध्ये त्यांचे निधन दिल्ली येथे झाले. आताही त्यांची प्रकाशन संस्था आहे. हयात असेपर्यंत ते सर्वाना मोठया अभिमानाने सांगत, माझे 'शांतीस्वरूप' हे नाव बाबासाहेबांनी ठेवले आहे. अशा अनेक आठवणी बाबासाहेब आंबेडकर यांच्या दिल्लीतील आहेत.

प्रज्ञा सूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वच स्तरातील लोकांमध्ये लोकप्रिय होते. आजही राजधानीत त्यांच्या आठवणी संसदेपासून ते दिल्लीतील लोकांमध्ये जाग्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या सर्वांना शुभेच्छा !

**- अंजु निमसरकर-कांबळे**

**माहिती अधिकारी**

****

'परळी परिसर' हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)

RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com

※ वर्ष ०८ ※ अंक ५१ ※ पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि.१४ एप्रिल २०२५ ※ किंमत : २ रू.

## परळीत वाहनातील बॅटऱ्या चोरणारांना पकडलं; मुद्देमालही केला हस्तगत !

परळी वैजनाथ, (बातमीदार):- शहरात ठीक ठिकाणी लावलेल्या मोठ्या वाहनांमधील बॅटऱ्या काढून चोरून घेऊन जाणारी टोळी मोठ्या प्रमाणावर सक्रिय झाली होती. या चोरांपर्यत पोहोचण्यात शहर पोलिसांना यश मिळाले आहे. मोठ्या ट्रक मधील बॅटऱ्या काढून चोरून घेऊन जाणाऱ्या दोन आरोपींना शहर पोलिसांनी पकडले आहे. त्यांच्याकडून तीन ट्रक मधील ६३ हजार रुपये किंमतीच्या सहा बॅटऱ्या हस्तगतही करण्यात आल्या आहेत.

याबाबत परळी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रघुनाथ यांनी सांगितले की, गेल्या काही दिवसांपासून रस्त्यावरील पार्क केलेल्या ट्रक व अन्य मोठ्या वाहनातील बॅटऱ्या चोरीचे प्रकार समोर येत होते. या संदर्भाने तीन ट्रक मालकांनी अंबाजोगाई रस्त्यावर लावलेल्या ट्रक मधील बॅटऱ्या काढून चोरीस गेल्या बाबतची फिर्याद पोलीस ठाण्यात दाखल केली होती. या अनुषंगाने तातडीने तपास करत बॅटऱ्या चोरणाऱ्या टोळीचा शोध पोलिसांनी घेतला. या तपासात शहर पोलिसांनी रेहान शेख मुस्तफा व अन्वर खान जलाल खान पठाण दोघेही राहणार गौतम नगर परळी वैजनाथ या दोन आरोपींना ताब्यात घेतले. सखोल चौकशीनंतर या दोन आरोपींकडून तीन ट्रक मधील ६३ हजार रु. किंमतीच्या सहा बॅटऱ्या हा मुद्देमाल हस्तगतही करण्यात आला आहे. दरम्यान या आरोपींच्या माध्यमातून वाहनांमधून बॅटऱ्या काढून चोरून नेणाऱ्या आणखी आरोपींपर्यंत पोहचायची शक्यता असुन अन्य बॅटऱ्या चोरीच्या घटनाही उघडकीस आणण्याच्या दृष्टीने पोलीस पुढील तपास करीत आहेत. ***

## भीमगर्जना की पुकार...!

समरसता नही समानता चाहिए
उपकार नही हमे अधिकार चाहिए
आप को मुबारकआपके रहेनुमा
हमे संविधान का शिल्पकार चाहिए

हात में ना कोई तलवार चाहिए
बस जिगर लढणे को तयार चाहिए
सेर्फ पढ़ लिखकर नही बनेगी अपनी बात
आंबेडकरवाद पर भी ऐतबार चाहिए

ना कमजोर दिल ना बिमार चाहिए
भीम का ये दिवाना दिलदार चाहिए
जाती-जाती मे बटने से जुल्म ही सहेगा
बहुजनो में भाईचारा और प्यार चाहिए

ना आवाज कोई बेकार चाहिए
भीमगर्जना की पुकार चाहिए
बहक न जाये कही तू किसी के बहकानेसे है
आंबेडकरवादी तो होशियार चाहिए

ना कोई गवार ना कोई शर्मसार चाहिए
फुले शाहू आंबेडकर का विचार चाहिए
वो इधर उधर अगर मगर की करेंगे बाते
इस दौर मे ज्ञान का तयार हत्यार चाहिए

ना कोई बेजार ना बेकार चाहिए
खुशहाल सबका परिवार चाहिए
आंबेडकरवाद ही मानवतावाद है
भीमराज कि हमे सरकार चाहिए

ना शेर ना शिकार ना तीर ना तलवार चाहिए
अन्याय और जुल्म पर यलगार चाहिए
आन बाण शान मान और सन्मान के लिए
भीम का अनुयायी अमोल लडने को सदा तयार चाहिए

– अमोल कांबळे, परळी वैजनाथ

## न्यू हायस्कूल शाळेत महात्मा ज्योतिराव फुले जयंती उत्साहात साजरी




परळी वैजनाथ (बातमीदार):- न्यू हायस्कूल थर्मल व नवीन प्राथमिक शाळा, परळी वैजनाथ येथे थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक श्री. एस. पी. देशमुख आणि पर्यवेक्षक श्री राठोड बी .एस. सर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. यावेळी श्री. देशमुख सर व त्यांच्या सर्व सहकार्यांनी महात्मा फुले यांना विनम्र अभिवादन केले. या वेळी सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. संजय सुरवसे सर यांनी विद्यार्थ्यांना महात्मा फुले यांच्या सामाजिक कार्याची व विचारधारेची माहिती दिली. त्यांनी माहात्मा फुले यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि स्त्रीशिक्षणविषयक कार्यावर प्रकाश टाकला. नवीन प्राथमिक शाळेचे शिक्षक श्री. उमेश देशमुख सर यांनीही विद्यार्थ्यांना महात्मा फुले यांच्या जीवन कार्या समजावून सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये समाजसुधारणेची प्रेरणा जागवली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. संजय सुरवसे सर यांनी तर आभारप्रदर्शन बाबासाहेब मुंडे सर यांनी केले. या कार्यक्रमात दोन्ही शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाने सामाजिक जागरूकतेचा व विचारप्रवर्तनाचा महत्त्वपूर्ण संदेश दिला. ***

